Internal circulation - 15/1/1987

Addressed to members of the Representative council of Yukrand Sarda

**प्रतिनिधी सभा परिपत्रक—**

युवक क्रांती दल, महाराष्ट्र
१२७३/२ आपटे रोड, पुणे ४११००४ दि. १५।१।८७

सप्रेम नमस्ते.

संघटनेच्या प्रतिनिधी सभेची बैठक दि २७, २८ डिसें '८६ रोजी पुण्यात झाली. त्यात औरंगाबाद, वैजापूर, मुंबई, पुणे, नागपूर इ. केंद्रातील प्रतिनिधी उपस्थित होते या बैठकीत पुढील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले:

१. संघटनात्मक – युक्रांदच्या सर्व केंद्रातील परिस्थितीचा व कार्याचा आढावा घेऊन त्यावर चर्चा करण्यात आली. दैनंदिन कामकाजामध्ये पध्दतशीरपणा येऊन कार्यक्षमता वाढावी या दृष्टीने आजच्या राजकीय–सामाजिक परिस्थितीत युक्रांदचे स्थान, संघटनेची रचना व कार्यपध्दती, संघटनेचा पाया अधिक व्यापक करण्यासाठीची उपाययोजना इ. संबंधी एक निवेदन कार्यकर्त्यांकडे पाठवावे, तसेच सर्व केंद्रांमध्ये बैठका घेऊन त्यावर चर्चा घडवून आणाव्या, असे ठरले.

२. सदस्य नोंदणीविषयी विचार होऊन संघटनेच्या प्राथमिक सदस्यत्वासाठी काही निकष सुचवण्यात आले. वार्षिक शिबिरात त्यांना मंजुरी घेऊन पुढील काळात त्यांची अंमलबजावणी करावी असे ठरले. हे निकष पुढीलप्रमाणे:
(अ) युक्रांदची मूलभुत भूमिका मान्य असावी. (ब) 'घोषणा'ची वर्गणी नियमित भरणे.
(क) संघटनेच्या शिस्तीचे व नियमांचे पालन करणे (ड) संघटनेच्या कोणत्याही किमान एका कामाची निश्चित जबाबदारी स्वीकारणे (इ) संघटनेची वर्गणी नियमित भरणे
(फ) स्थानिक केंद्राच्या वार्षिक शिबिराला उपस्थित राहणे.

३. युक्रांदचे वार्षिक शिबिर दि. २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च '८७ रोजी औरंगाबाद जिल्ह्यात होईल. निश्चित ठिकाण नंतर कळवले जाईल.

<u>विषय</u> — 'संघटनात्मक आढावा व परिस्थितीवर चर्चा', 'राजकीय परिस्थिती व संसदबाह्य संघटनांचे स्थान' 'सद्य परिस्थितीविषयक ठराव' 'पुढील कार्यकारिणी व पदाधिकारी आणि कार्यक्रम ठरविणे' 'मित्रसंघटनांसमवेत खुली चर्चा'.

आर्थिक – या शिबिराला सुमारे ७०००/- रुपये खर्च येईल असा अंदाज असून मुंबई, पुणे व औरंगाबाद केंद्राकडून प्रत्येकी रु. २०००/- व नागपूर केंद्राने रु. १०००/- जमा करून द्यावे असे ठरले.

<u>घोषणा</u> — या शिबिराच्या निमित्ताने घोषणाचा विशेषांक प्रकाशित होईल. त्यात प्रामुख्याने संघटनाविषयक लेखन केले जाईल. या अंकातील जाहिरातीमार्फत निधी गोळा करावा, तसेच सर्व कार्यकर्त्यांकडून शिबिरापर्यंत 'घोषणा' वर्गणी गोळा करावी.

४. समविचारी संघटनांबरोबर चाललेल्या संवादाची तसेच कार्यक्रमांची माहिती प्रतिनिधीसभेपुढे ठेवण्यात आली. पुढील काळात यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार वार्षिक शिबिरात पुढील कार्यकारिणीस देण्यात येतील.

या परिपत्रकाचे वाचन आपापल्या केंद्रात करून त्याविषयी आवश्यक ती कारवाई करावी. शिबिरविषयक आपल्या सूचना मध्यवर्ती कार्यालयाकडे कळवाव्या.

कळावे,

आपला,
अजित सरदार
कार्यवाह